दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ९७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज कोरोनाच्या ९,७७१ नव्या रुग्णांचे निदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात गेल्या २४ तासात एकूण ९ हजार ७७१ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे. तर, आज एकूण १० हजार ३५३ इतके रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. तसेच, आज दिवसभरात १४१ करोना बाधितांचा मृत्यू झाला आहे. दिलासादायक म्हणजे आज नव्या रुग्णांच्या तुलनेत बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक आहे.

आजच्या १४१ करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूबरोबरच राज्यातील मृत्यूदर २.०१ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ५८ लाख १९ हजार ९०१ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.०२ टक्क्यांवर पोहोचले आहे. राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या १ लाख १६ हजार ३६४ इतकी झाली आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुण्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. पुण्यात हा आकडा १७ हजार ४०७ इतका आहे. तर, पुण्याच्या खालोखाल ठाण्यात एकूण १६ हजार ११५ इतके रुग्ण आहेत.

# गणेश देशमुख यांनी स्वीकारला आयुक्तपदाचा कार्यभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**आयुक्त सुधाकर देशमुख यांची भिवंडी-निजापूर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी बदली झाल्याने पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्तपदी पुन्हा एकदा गणेश देशमुख यांची नियुक्ती झाली आहे. आज (बुधवार दि.३० जून) महापालिका मुख्यालयातील आयुक्त दालनात गणेश देशमुख यांनी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी आयुक्त सुधाकर देशमुख यांनी गणेश देशमुख यांच्याकडे पनवेल महापालिका आयुक्तपदाचा पदभार सुपूर्द केला.**

## आयुक्त सुधाकर देशमुख यांनी सुपूर्द केला पदभार




यावेळी सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, मनोहर म्हात्रे, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त चंद्रशेखर खामकर, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, मुख्य लेखा परिक्षक विठ्ठल सुडे, मनोजकुमार शेट्टे, महापालिका अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेची ऑक्टोबर २०१६ रोजी स्थापना करण्यात आली. आयुक्त सुधाकर शिंदे यांच्यानंतर नांदेड महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदी बदली करण्यात आली होती. पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर आयुक्त गणेश देशमुख यांच्या काळात अनेक विकास कामांना सुरूवात झाली होती.

नव्याने स्थापन झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या प्रशासनाचा कार्यभर त्यांनी योग्यरीत्या सांभाळला. गणेश देशमुख यांनी पनवेल येथे यापूर्वीही आयुक्तपदी कार्यरत असताना उत्कृष्ट कामे केली आहेत. पालिकेचे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावून नवीन प्रकल्पांना त्यांनी चालना दिली होती. मागील वर्षी कोरोना काळातही अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊन कोरोना परिस्थिती हाताळण्यात त्यांनी यश मिळवले होते. परंतु गेल्यावर्षी ऐन कोरोना सुरुवात होण्याच्या वेळी गणेश देशमुख यांची ठाणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर सुधाकर देशमुख पनवेल महापालिकेचे नवे आयुक्त झाले. दरम्यान मंगळवारी शासनाने अध्यादेश काढून सुधाकर देशमुख यांची भिवंडी- निजामपूर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी बदली केली. त्यांच्या जागी पनवेल महापालिकेची यापूर्वी सूत्रे संभाळलेल्या गणेश देशमुख यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे.

प्रशासनाचा दांडगा अनुभव असणाऱ्या गणेश देशमुख यांची पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदी पुन्हा एकदा नियुक्ती झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमधून तसेच सर्वच स्तरातून समाधान व्यक्त केले जात आहे.

> राज्य शासनाच्या आदेशान्वये पनवेल महापालिकेच्या आयुक्त पदाचा पुन्हा एकदा पदभार स्वीकारताना निश्चितच आनंद होत आहे. जे प्रकल्प आता सुरू आहेत ते प्रकल्प प्राधान्याने पुढे नेण्यासाठी भर दिला जाईल.
> **- गणेश देशमुख,**
> **आयुक्त पनवेल महापालिका**

## संक्षिप्त...

### सातवा वेतन आयोगाच्या थकबाकीचा दुसरा हफ्ता लवकरच मिळणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर आहे. सातव वेतन आयोगाच्या थकबाकीचा दुसरा हफ्ता राज्य सरकारकडून लवकरच दिला जाणार आहे. निवृत्तीवेतनच्या थकबाकीच्या दुसऱ्या हफ्त्याची रक्कम जुलै महिन्याच्या निवृत्ती वेतन सोबत रोखीने दिली जाणार आहे. राज्य सरकारी कर्मचारी सातवा वेतन आयोग थकबाकीच्या दुसरा हफ्ता ऑगस्ट महिन्याच्या पगाराबरोबर दिला जाणार आहे. तर जिल्हा परिषदा, अनुदानित शाळा तसेच इतर अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना दुसऱ्या हफ्त्याची थकबाकी रक्कम सप्टेंबर महिन्यातील पगारात दिली जाणार आहे. शासनाने अधिसूचना काढून ३० जानेवारी २०१९ सातव्या वेतन आयोगाची थकबाकी सन २०१९-२० पासून पुढील ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्याचा आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रोखीने अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच निवृत्तिवेतनाच्या थकबाकीची रक्कम ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत रोखीने अदा करण्याचे २४ जानेवारी २०१९ आणि १ मार्च २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेशित केले आहे. जे कर्मचारी (भविष्य निर्वाह निधी योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांसह) १ जून, २०२० ते या शासन आदेशांच्या दिनांकापर्यंत सेवानिवृत्त झाले असतील अथवा मृत्यू पावले असतील, अशा कर्मचाऱ्यांना वेतनाच्या थकबाकीच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम रोखीने देण्यात येणार आहे.

## पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात २ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात गेल्या २४ तासात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार तर एक जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेलजवळील कोन सावळा रोड, सोमटणे पेट्रोल पंपाजवळ, टिसीएल कंपनीच्या गेटसमोरील रस्त्यावर प्रतिक गोडीवले (वय-२५, रा.-गुळसुंदे) हे त्यांच्या ताब्यातील हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल घेऊन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने चालवून ओव्हरटेक करीत असताना, समोरून येणाऱ्या यामाहा कंपनीच्या मोटारसायकलीस ठोकर मारून झालेल्या अपघातात प्रतिक गोडिवले हे गंभीररित्या जखमी होऊन त्यांचा मृत्यु झाला आहे. तर शेखर गडगे (वय-२५, रा.-वडगाव) हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत तळोजा औद्योगिक क्षेत्रातील देना बँकेजवळ, मोतीराम लडकू दुर्गे (५५) यांना टँकरची जोरदार धडक लागल्याने त्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. दुर्गे यांचे वाहनावरील नियंत्रण सुटून ते टँकरच्या मागच्या चाकाखाली आल्याने ते चाकाखाली चिरडले गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर टँकरचालक फरार झाल्याने अपघातग्रस्त दुर्गे यांचा मृतदेह काही काळ रस्त्यावरच पडून होता. या अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच वाहतूक शाखेचे वपोनि महेश पाटील व त्यांचे पथक त्वरित घटनास्थळी गेले.

अपघातानंतर टँकर चालक फरार झाल्याने त्याला पकडण्यासाठी तळोजा वाहतूक शाखेचे कर्मचारी तातडीने परिसरात शोध घेऊ लागले. अखेर काही वेळातच तळोजा वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी टँकर चालकाचा शोध घेऊन त्यास तळोजा पोलिसांच्या ताब्यात दिले. सदर अपघात प्रकरणी पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या टँकर चालकावर तळोजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या अपघात प्रकरणाचा अधिक तपास तळोजा पोलीस करीत आहेत.

## विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्यास मान्यता रद्द; शालेय शिक्षणमंत्र्यांचा इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क आहे.कोरोनाच्या काळात अनेक पालकांच्या नोकरी, व्यवसायात बाधा निर्माण झाली आहे. आर्थिक समस्यांमुळे पालकांना आपल्या मुलांचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. यामुळे काही पालकांनी शाळेची फी भरली नाही. अशा विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक संस्थेने शिक्षणापासून वंचित ठेवले आहे.



ऑनलाईन वर्गात प्रवेश दिला नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरच्या पत्यावर शाळा सोडल्याचा दाखला पाठवला आहे. शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी अशा शाळांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.


शिक्षण संस्थाना व व्यवस्थापकांना कोणत्याही विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणापासून दूर ठेवता येणार नाही. फी भरण्यासाठी दबाव आणणे व शाळेतून काढून टाकणे अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास अशा शाळांची मान्यता रद्द करण्याचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिले आहेत. अशा प्रकारे बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करून कठोर कारवाई करण्यात यावी असे निर्देश शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण अधिकार्यांना दिले आहेत.

### आदिवासी बांधवांच्या विकासासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे कटिबध्द

## पाथरज आश्रमशाळेकरिता रु.११ कोटी ३४ लक्ष तर पिंगळज वसतिगृहाच्या इमारतीसाठी रु.१३ कोटी १९ लक्ष निधी मंजूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती सुनिल तटकरे यांच्या पुढाकारातून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागाशी सतत समन्वय साधून जिल्ह्यातील आदिम जमाती, आदिवासी बांधवांकरिता विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरु आहेत.



या पार्श्वभूमीवर नुकतेच राज्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळा वसतिगृहांच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विभागस्तरावरील गठीत समितीची बैठक आदिवासी विकास सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये शासकीय आश्रमशाळा, वसतिगृह अशा बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी निकष ठरवून निकष पूर्ण करणाऱ्या एकूण २६ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

यापैकी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पाथरज येथील शासकीय आश्रमशाळेची शालेय इमारत या कामाकरिता .../२

## कोरोनामुळे निधन झालेल्या कामगारांच्या कुटुंबाला टीआयपीएलकडून आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनामुळे मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाकूर इंफ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड अर्थात टीआयपीएल कंपनीच्या वतीने ०२ लाख रुपयांची आर्थिक मदतीचा आधार देऊन एक आदर्श पायंडा पाडला आहे.



टीआयपीएलमध्ये सुपरवायझर या पदावर काम करणारे विशाल तुकाराम घरत, संजय धर्माजी म्हात्रे यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबाला आधार मिळावा यासाठी प्रत्येकी ०२ लाख रुपयांचा धनादेश पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते मृत कामगारांच्या कुटुंबाला देण्यात आला. यावेळी टीआयपीएलचे संचालक धनंजय करतुरी, एच आर मॅनेजर शशिकांत मुंबईकर, आयटी मॅनेजर संदिप आंग्रे, ॲडमिन मॅनेजर सतिश उगले, एच आर असिस्टंट मॅनेजर रविंद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

कोरोनाच्या संकटकाळात अनेक रोजगार, व्यवसाय बंद पडले, अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. आणि कोरोना एवढ्यावरच थांबला नाही तर अनेकांना प्राणाला मुकावे लागले आहे. अशा गंभीर परिस्थितीत आपल्या कंपनी कुटुंबातील व्यक्तीच्या निधनामुळे त्याच्या कुटुंबियांवर आणि कंपनीवर शोककळा पसरली. कामगार हा कंपनी कुटुंबातील भाग असल्याने ठाकूर इंफ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने कोरोनामुळे मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह .../२

## धोकादायक विद्युत पोल हलविण्याच्या कामाला सुरुवात

### विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सावरकर चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्यालगत असणारे विद्युत पोल व विद्युत तारा धोकादायक अवस्थेत लोंबकळत आहेत. काही विद्युत पोल एकाबाजूस झुकलेले आहे, त्यामुळे जड वाहन येथून जात असताना शॉक लागण्याचे प्रकार घडत आहेत. याच रस्त्यावर नवीन कोर्ट असल्याकारणाने येथे दैनंदिन मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरु असते. त्यातच धोकादायक अवस्थेत असणाऱ्या विद्युत पोल व विद्युत तारांमुळे मोठा आपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी देखील या



विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यानी महावितरणचे अधिकारी आणि आयुक्त यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेत धोकादायक विद्युत पोल हलविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

सावरकर चौक ते अमरधाम रस्त्यावर अनेक धोकादायक विद्युत पोल आहेत. रस्त्याच्या मधोमध असलेल्या विद्युत पोलमुळे गेल्या काही दिवसात .../२

## पनवेल परिसरात शिक्षणसंस्थाकडून विद्यार्थ्यांवर अन्याय

### मुजोर शिक्षणसंस्था व चालकांवर कारवाई करण्याची युवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्याच्या कोविड महामारी काळात अनेक नागरिकांनी आपले व्यवसाय तसेच नोकऱ्या गमावल्या आहेत. अनेक नागरिकांना ह्या महामारीमुळे आर्थिक चणचणीला सामोरे जावे लागत असतानाच पनवेल क्षेत्रातील अनेक संस्थानी पालकाना नोटीस पाठविणे तसेच तडकाफडकी शाळेतून काढून टाकणे असे जुलमी निर्णय घेतले आहेत. सदर कृती ही माणूसकीला काळिमा फासणारी असून सरकारी अध्यादेशांचीही पायमल्ली करणारी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय करनारया मुजोर शिक्षणसंस्था व चालकांवर कारवाई करण्याची मागणी युवासेनेने केली आहे.



पनवेल परिसरात शिक्षणसंस्थाकडून विद्यार्थ्यांवर अन्यायाच्या कृतीविरोधात शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मंत्री आदित्य ठाकरे ह्यांच्या नेतृत्वाखाली व युवासेना सचिव, कॉलेज कक्षप्रमुख वरुण सरदेसाई ह्यांच्या आदेशानुसार जिल्हा समन्वयक नितिन पाटिल व विधानसभा अधिकारी पराग मोहिते ह्यांच्यासह युवासेना .../२

# आदर्श मुख्याध्यापिका कलावती पाटील सेवानिवृत्त ; संस्थेमुळेच मी खंबीरपणे उभी राहू शकले : कलावती पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेच्या आदर्श मुख्याध्यापिका कलावती पाटील आज वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त झाल्या. त्यांना शाळेच्यावतीने सेवापूर्ती कौटुंबिक कार्यक्रमात निरोप देण्यात आला.



सदर कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष ऍड मंगेश नेने, कार्याध्यक्ष वसंत आठवले, खजिनदार संजय कडू, सचिव प्रशांत ओक, संचालक सुधीर जोशी, दिलीप बापट, ललित पाटील, किरण देव, ज्योती राजे, शंकर भट, दिगंबर चिंचणीकर, पूनम शहा, डॉ.नीता कदम, नगरसेविका तेजस्विनी नेने, मुख्याध्यापिका विद्या घरत, मुख्याध्यापिका पटवर्धन आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षकी पेशात ३४ वर्षे पूर्ण केल्यानंतर मुख्याध्यापिका कलावती पाटील आज सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या या सेवानिवृत्ती बाबत आज पेण एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात शिक्षकांनी सेवापूर्ती सोहळा आयोजित केला होता. यावेळी बोलताना मुख्याध्यापिका कलावती पाटील यांनी आपल्या बालपणापासून ते शिक्षक सेवेतील आनंदी आणि कटू अशा दोन्ही प्रकारच्या आठवणी सांगताना संस्थेने दिलेले प्रेम, माझ्यावर टाकलेला विश्वास या गोष्टी मी कधीच न विसरता, त्यांनी दिलेला आत्मविश्वास आणि मार्गदर्शनामुळेच मी या ठिकाणी खंबीरपणे उभी राहू शकली असेही सांगितले.

तर पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ऍड.मंगेश नेने यांनी सांगितले की, अशा मुख्याध्यापिका मी पहिल्यांदाच पहिल्या आहेत की त्यांच्या कारकिर्दीत एकाही विद्यार्थ्यांची किंवा एकाही पालकाची तक्रार माझ्याकडे आली नाही. त्यामुळे या मुख्याध्यापिकांचा काम कसा असेल हे सहज स्पष्ट होत असून जरी आज त्या सेवा निवृत्त झाल्या असतील तरी शाळेमध्ये जमेल त्या वेळेला येऊन आमच्या शिक्षकांना मार्गदर्शन करावे असे सांगून कलावती पाटील यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंत आठवले, खजिनदार संजय कडू, पेण पालिकेच्या नगरसेविका तेजस्विनी नेने, शिक्षिका कमल पाटील यांनी कलावती पाटील यांच्या कार्याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची सुरुवात इशस्तवनाने करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका लेखा ठाकूर यांनी तर सूत्रसंचालन सुषमा साखरे आणि आभार अपर्णा वाघमारे यांनी मानले.

# कालवलीतील पहिल्या सहकारी तत्वावरील नळपाणी योजनेला वाढता प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कालवली येथील विविध मोहल्ले व वाड्यांच्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करणाऱ्या योजना नादुरूस्त झाल्यानंतर विजबिल थकबाकीने कायमच्याच बंद पडल्या असताना तेथील तरूण अब्दुलहक खलफे यांनी मोठ्या महत्प्रयासाने पहिली सहकारी तत्वावर नळपाणी योजना सुरू केली. आतापर्यंत मर्यादित स्वरूपात सुरू असलेल्या या योजनेतून आता त्याच गावातील दुसऱ्या मोहल्ल्यातील २२ घरांपर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. पोलादपूर तालुक्यातील बंद योजनांसमोर अब्दुलहक खलफे यांनी आदर्शवत् नळपाणी योजना सुरू केली आहे.

२००५ साली वावे, धारवली, कालवलीसह परिसरातील सात गावांसाठी सावित्री नदीतून हावरे गावात जॅकवेलद्वारे उपसा करून पाणी पुरवठा करण्याची योजना वावे आणि धारवली येथे नवीन योजना कार्यान्वित झाल्यावर थकित विद्युतबिल केवळ कालवली ग्रामपंचायतीवर पडल्याने बंद झाली. यानंतर भारत निर्माण योजनेतून कालवली भोसलेवाडी गावठाणामध्ये २००५ च्या अतिवृष्टी अन् भूस्खलनामध्ये जमिनदोस्त झालेल्या पूर्वापार तलावाच्या ठिकाणी साठवण तलाव बांधून तयार असलेली योजना २००८-०९ मध्ये तयार झाली. काही कारणास्तव ती ठेकेदारी करणाऱ्याखेरिज अन्य कोणासही पाण्याचाही लाभ देऊ शकली नाही. मात्र, भारत निर्माण योजनेच्या नियमानुसार कालवली गावात पाणी योजना कार्यान्वित झाल्यानंतर टंचाई निवारण झाल्याचे गृहित धरून टँकरमुक्त घोषित करण्यात येते. २०१० साली एप्रिल महिन्यात कालवलीमध्ये पाणी टंचाई निर्माण होऊनही येथे टँकरद्वारे पाणी देण्याची नामुष्की पोलादपूर पंचायत समितीवर आली होती. या सर्व काळात कालवली गावातील वलीले मोहल्ला, पवारवाडी, भोसलेवाडी, विठ्ठलवाडी, बौध्दवाडी, पाटीलवाडी आणि तिवडेकर मोहल्ला येथील ग्रामस्थ या सातही वाड्यांमध्ये असलेल्या विहिरींमधून पाणी पिण्यासह इतर वापरासाठी मिळवित आहेत.

तीन वर्षांपूर्वी कालवली वलीले मोहल्ला येथील प्रगत विचारांचा तरूण अब्दुलहक खलफे याने कालवली वलीले मोहल्ल्यातील १७ घरांसाठी तेथील विहिरीवर पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीची रितसर परवानगी मिळवून स्वखर्चाने पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली. या काळात दरमहा २०० रूपये सरासरी विद्युतबिले अदा करून ४०० रूपये पगाराचा कर्मचारी ठेऊनही ही योजना सुमारे ८ हजार रूपयांपर्यंत फायद्यात राहिली. दरम्यानच्या काळात कालवली ग्रामपंचायत तंटामुक्त झाली. ३० सप्टेंबर २०१० रोजी तंटामुक्त गांव समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडीसाठी झालेल्या ग्रामसभेस वलीले मोहल्ल्यातून कोणीही सहकार्य केले नसल्याचा आकस ठेऊन या आदर्शवत् पाणी योजनेवरच बंदी आणण्याचा विचार कोण्या एककल्ली गांवपुढाऱ्याने अंमलात आणण्यासाठी सदर योजनेला परवानगी देणाऱ्या मूळ ठरावाच्या प्रतीमध्ये 'केवळ पावसाळ्यापुरती ही योजना कार्यान्वित करण्याची परवानगी देत आहोत' असा उल्लेख वाढवून अब्दुलहक खलफे यांना सदर योजना बेकायदेशीर असल्याचे सांगून चर्चेस बोलाविले. यानंतर ही फायद्याची योजना बंद करण्याचा ग्रामसभेचा ठरावही बजावण्यात आला. यामुळे नळपाणी योजना सुरू झाल्यापासून आजतागायत एकही दिवस बंद ठेवली गेली नसलेली ही योजना या ग्रामपंचायतीच्या या ठरावामुळे बंद करावी लागणार, या अन्यायाविरूध्द अब्दुलहक खलफे यांनी महाड येथील कायदेतज्ज्ञ ॲड. नंदकिशोर मोरे यांच्यामार्फत महाड दिवाणी न्यायालयात दाद मागितली आहे. २८ जानेवारी २०११ रोजी न्यायालयाने कालवली ग्रामपंचायतीच्या बंदी आदेशाला या प्रकरणी निकाल लागेपर्यंत स्थगिती दिली. त्यामुळे कोर्टकचेरीनंतरसुध्दा अव्याहतपणे सुरू राहिलेली नियमितपणामुळे व परवडणाऱ्या पाणीपट्टीमुळे ना नफा ना तोटा तत्वावर आजतागायत सुरू आहे. या योजनेच्या विहिरीत पाणी नसल्यास नफ्याच्या रकमेतून टँकरने पाणी विहिरीत ओतण्यात आले. अगदीच जाणीवपूर्वक टँकर बंद करून पाणी योजना बंद करण्यासाठी प्रयत्न झाल्यानंतर अब्दुलहक खलफे यांनी आंदोलनाचा पवित्राही घेतला.आता या नळपाणी योजनेच्या शाश्वत पाण्याची खात्री पटल्याने कालवलीतील वरच्या मोहल्ल्यानेदेखील या पाण्याची अपेक्षा व्यक्त केल्यानंतर रोशनी संस्थेच्यामाध्यमातून अब्दुलहक खलफे यांनी विहिरीवर मोटार टाकून नव्याने ३०० मीटर अंतरावर पाईपलाईनद्वारे तब्बल २२ घरांना चोवीस तासात कधीही नळ सुरू केल्यास मुबलक पाणी उपलब्ध केले आहे.

# प्रितम म्हात्रे यांच्या प्रयत्नाने संजय डुलगज यांना महापौर निधीतून २५ हजार रुपयांची मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयात महापौर सहाय्यता निधीतून मदत मिळण्यासाठी संजय जयसिंग डुलगज यांना २५ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे. यासाठी विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी शिफारस पत्र सादर केले होते. या मदतीमुळे संजय डुलगज याने विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.



वाल्मिकी नगर, पनवेल येथील संजय डुलगज हे हृदयविकाराने ग्रस्त आहेत. त्यांच्यावर के ई एम रुग्णालय परेल येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यासाठी ६ लाख रुपयांचा खर्च येणार आहे. महापौर सहायता निधीतून या रुग्णास आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रितम म्हात्रे यांनी शिफारस पत्र सादर केले होते. तसेच आवश्यक ती कागदपत्रे जमा केली होती. त्यानुसार संजय डुलगज यांना महापौर निधीतून २५ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.

# मुरुडच्या वनविभागातर्फे वृक्षलागवड

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनाच्या झाडे लावा झाडे जगवा कार्यक्रमांतर्गत वनविभागाचे रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, सहाय्यक वनसंरक्षक विश्वजीत जाधव व मुरुड वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील मोरे येथे वृक्षलागवड करण्यात आली.

यामध्ये वनविभागाच्या कॅम्पा पर्यायी वनीकरण योजनेअंतर्गत मुरुड तालुक्यातील मोरे येथे कं.नं.६७६ मधील ८.०७ क्षेत्रात आवळा, साग, चिंच, करंज, बहावा, सिताफळ, सिसव, ऐन, बांबू, आंबा, काजू, जांभूळ आदी. ९००० रोपे लावण्यात येऊन वृक्षलागवड करण्यात आली. वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी एम.एस .कराडे, वनरक्षक के.बी.जाधव (विहूर), श्रीमती सोनू म्हस्के (उसरोली), श्रीमती मुनीया मुल्ला (महालोर) यांनी या वृक्षलागवड कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : बोर्ले, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची श्री.बळीराम गोटीराम पाटील यांचे मालकीची शेतजमीन मिळकत, त्या शेतमिळकतींचे विद्यमान शेतजमीन मालक यांचेकडून एकूण शेतजमीन क्षेत्र ०-२०-४० गुंठे क्षेत्रापैकी विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करिता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-१२-४० गुंठे कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून, तसा करार उभयपक्षी यांचेत स्वाक्षरीत झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : बोर्ले, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतींचे वर्णन**

| शेतजमीन मालकांचे नाव व गाव | गट क्रमांक | उप विभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री.बळीराम गोटीराम पाटील रा.मु.बोर्ले, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड | ३२ | ० | ०-२०-४० गुंठे पैकी विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करिता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-१२-४० गुंठे | ६.२५ |

वर वर्णन शेतजमीन शेतजमीन मालक श्री.बळीराम गोटीराम पाटील, यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबे, कब्जा वहिवाटीतील असून ०-२०-४० गुंठे शेतजमीन क्षेत्रापैकी विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करिता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-१२-४० गुंठे विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान शेतजमीन मालक श्री.बळीराम गोटीराम पाटील यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या एकूण शेतजमीन मिळकती पैकी विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करिता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-१२-४० गुंठे अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचेही विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी ताबा, कब्जा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, कुळ हक्क, दिवाणी दावा, महसूल वाद या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांचे हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील आमचे कार्यालयाचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात आणून द्यावीत. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान शेतजमीन मालकांच्या निर्वेध व र्निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान शेतजमीन मालकांच्या तसेच आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : पनवेल
दि.३०/०६/२०२१

**सही/-**
**ॲड.डि.पी.घरत**
**शॉप नं.३१, पहिला मजला, पनवेल महानगरपालिका कॉम्प्लेक्स, कृष्णाळे तलावाचे विरुद्ध वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे बाजूला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८०८०५८५८४६/८०८०५८५८४८**

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील दिवाणी कोर्टामध्ये दावा प्रलंबित असल्याबाबत**

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल पद्माकर तुकाराम कोळी, रा.देवदूत को.हौ.सोसायटी बिल्डींग नं.१०६, रुम नं.२०७, दुसरा मजला, न्यू म्हाडा वसाहत, मानखुर्द (पश्चिम), मुंबई यांनी पनवेल दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.मु.२८/२००९ हा दावा श्री.नामदेव गणपत कोळी रा.ऐरोली, बी.२८८, सेक्टर २, नवी मुंबई यांचे विरुद्ध दावा सरस-निरस वाटप करून मिळणेकरिता व ठरावाकरिता, निरंतर व तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२९ | ५ | ०-१२-३ पो.ख. ०-०२-१ | १=८७ |
| १३४ | २ | ०-१६-३ पो.ख. ०-०२-३ | ३=२६ |

दावा मिळकतीबद्दल पनवेल येथील दिवाणी न्यायालयामध्ये वाद चालू असल्यामुळे या मिळकतीवर अथवा त्या मिळकती अनुषंगाने मिळणाऱ्या भूखंडा संदर्भात इतर व्यक्तींचे हक्क-हितसंबंध प्रस्थापित करू नयेत. सबब सदरील दावा मिळकतींवर कोणतेही बांधकाम अथवा तिऱ्हाईत इसमांचे हक्क प्रस्थापित करू नये, असे केल्यास सदर व्यक्ती अथवा संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३०/०६/२०२१

**सही/-**
**ॲड.तृप्ती गजानन पाटील**
**४, श्रीसमर्थ अपार्टमेंट शिवाजी रोड, पनवेल ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८१९९२३८२७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.शशिकांत कृष्णाजी पाटील, सौ.नंदिनी अंकुश शिंदे यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : देवद, ता.पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| ४१ | १ | २५.००.०० | २५०.०० | श्री.शशिकांत कृष्णाजी पाटील |
| | | २५.००.०० | २५०.०० | सौ.नंदिनी अंकुश शिंदे |

वरील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३०/०६/२०२१

**सही/-**
**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.९८९२२२२२५७**

# कडसुरे ग्रामस्थांचे उपोषण स्थगित

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठण्याजवळील कडसुरे (ता.रोहा) येथील नळ पाणीपुरवठा योजनेत केलेला भ्रष्टाचार व योजनेतील पैशांचा अपहार प्रकरणी योजनेचे अध्यक्ष असलेल्या व संबधित विद्यमान सरपंचांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन सरपंच पदावरून काढण्यासाठी कडसुरे ग्रामस्थांकडून रायगड जिल्हा परिषद कार्यालयासमोर करण्यात येणारे उपोषण राजिपच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांच्याकडून मिळालेल्या संबंधितावर कारवाई करण्याच्या लेखी आश्वासना नंतर कडसुरे ग्रामस्थांकडून स्थगित करण्यात आले आहे.

## गहाळ झाले आहे

किनारा को.ऑप. हौसिंग सोसायटीचे सदस्य श्री.नारायण अंबु आंबोलकर यांच्या नावाने काढलेली शेअर्स सर्टीफिकेट क्रमांक ०९३ व शेअर क्रमांक ४६१ ते ४६५ हे गहाळ झाले आहेत. तरी ते कोणाला मिळाल्यास किनारा को.ऑप हौसिंग सोसायटी बावन बंगला पनवेल-४१०२०६ (रायगड) या पत्यावर आणून देणे.

**चेअरमन**
**किनारा को.ऑप.हौसिंग सोसायटी, पनवेल, जि.रायगड**

# ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि. ३०/०६/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे व खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ०१/०७/२०२१ ते ०७/०७/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ०८/०७/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कोळखे पेठ येथील गटार व चेंबर साफ करणे व दुरुस्ती करणे | १५४८१४/- | १५४८/- | १ महिना |

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | क्लोरीवॅट बॉटलची खरेदी करणे |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

६) साहित्याचे व वस्तूचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# वसतिगृहाच्या इमारतीसाठी रु.१३ कोटी १९ लक्ष निधी मंजूर

एकूण रु.११ कोटी ३४ लक्ष २७ हजार इतक्या तर याच तालुक्यातील पिंगळज येथील मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीसाठी रु.१३ कोटी १९ लक्ष ३६ हजार इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. या कामांची सुरुवात सन २०२१- २२ या आर्थिक वर्षापासून सुरू होणार आहे. आदिवासी जमातीची कुटुंबे अतिदुर्गम व अविकसित अशा सीमाभागात राहत असल्यामुळे या कुटुंबांना जीवनावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध होणे कठीण असते. त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण, आरोग्य तपासणी व उपचार, दैनंदिन आवश्यक अन्न किंवा वापर वस्तूंचा पुरवठा, मनोरंजन व करमणूक आणि त्यांच्या उपजीविकेवर आधारित व्यवस्था निर्माण होण्यासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे या अहोरात्र प्रयत्नशील आहेत. त्यांच्या पुढाकारातून आदिवासी बहुल भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांसाठी शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सुधागड-पाली तालुक्यातील मौजे जांभूळपाडा येथे आदिम जमाती (झतढ्ढ्र) (कातकरी) यांच्याकरिता बहुद्देशीय संकुल उभारण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे कु. आदिती तटकरे यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पात तशी घोषणा करण्यात आली होती. पालकमंत्री कु.तटकरे या आदिवासी बांधवांकरिता करीत असलेल्या प्रयत्नांमुळे आदिवासी समाजाच्या प्रगतीस चालना मिळणार आहे.

## टीआयपीएलकडून आर्थिक मदत

निधी, ग्रॅज्युएटी, विमा अशी भरपाई देण्याबरोबरच स्वतःहून टीआयपीएल कंपनीच्या वतीने प्रत्येक मृत कामगाराच्या कुटुंबाला ०२ लाख रुपयांची आर्थिक मदत केली असून यापुढेही कामगारांच्या कुटुंबाच्या पाठीशी कंपनी उभी राहील, असे कंपनीच्यावतीने आश्वासित करण्यात आले. कोरोना काळात टीआयपीएलने मृत कामगारांच्या बाबतीत केलेल्या मदतीने इतर कंपन्यांसमोर आदर्श ठेवला आहे.

## धोकादायक विद्युत पोल हलविण्याच्या कामाला सुरुवात

अनेक अपघात घडले आहेत. तसेच विद्युत तारा जमिनीला लोम्बकळलेल्या अवस्थेत असताना टेम्पोला शॉक लागल्याची घटना घडली होती. अशा घटना पनवेल पालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे ह्यांच्या निदर्शनास येताच विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता माणिक राठोड आणि जयदीप नानोटे ह्यांच्या सोबत लेखी पत्रव्यवहार करून आज धोकादायक विद्युत पोल हलविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

## पनवेल परिसरात शिक्षणसंस्थाकडून विद्यार्थ्यांवर अन्याय

शिष्टमंडळाने पनवेल गटशिक्षण अधिकारी महेश खामकर ह्यांची भेट घेत मुजोर शिक्षणसंस्था व चालकांवर तातडीने कारवाई करून शासकीय नियमांनुसार समज द्यावी अन्यथा सरकारकडून सवलती मिळवून जर मुजोर संस्थाचालक जनतेवरच अन्याय करणार असतील तर युवासेना ते चालू देणार नाही व अशा संस्थावर युवासेनेच्या माध्यमातून उग्र आंदोलन केले जाईल असेही युवासेनेच्या माध्यमातून कळविण्यात आले. ह्यावेळी उपविधानसभा अधिकारी अरविंद कडव, उपविधानसभा अधिकारी सुशांत सावंत, शहर अधिकारी निखिल भगत, शहर अधिकारी जय कुष्टे, विभाग अधिकारी जीवन पाटिल, सुयश बंडगर, सौरभ म्हामुणकर आदी उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बँक अकाऊंटमधून काढले जवळपास ५७ लाख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

यु.के. येथून भारतात पाठविलेल्या सामानाकरीता एअरपोर्ट क्लिअरन्स डिपार्टमेंट टॅक्स, जीएसटी, करन्सी कनव्हर्जन चार्जेस, डिलेव्हरी चार्जेस, इन्शुरंस, सिक्युरिटी रूम चार्जेस अशी वेगवेगळी कारणे सांगून लबाडीच्या इराद्याने पनवेलमधील एका व्यक्तीच्या वेगवेगळ्या बँक अकाऊंटमधून जवळपास ५७ लाखांची रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास भाग पाडून फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

प्रिंटा कुमारी (वय-३२) यांना आलेल्या फोनवरून अद्रिक कुमार बोलत असल्याचे सांगून कारगो डिपार्टमेंट दिल्ली येथून बोलणारे अनोळखी इसम यांनी त्यांना अद्रिक कुमार याने यु.के. येथून भारतात पाठविलेल्या सामानाकरीता एअरपोर्ट क्लिअरन्स डिपार्टमेंट टॅक्स, जीएसटी, करन्सी कनव्हर्जन चार्जेस, डिलेव्हरी चार्जेस, इन्शुरंस, सिक्युरिटी रूम चार्जेस अशी वेगवेगळी कारणे सांगून लबाडीच्या इराद्याने त्यांच्या वेगवेगळ्या बँक अकाऊंटमधून जवळपास ५७ लाखांची रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास भाग पाडून फसवणुक केल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे भक्त निवास क्रमांक १ मध्ये रक्तदान शिबिर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनाच्या महामारीत रक्ताचा तुटवडा भेडसावत आहे. त्यामुळे हा तुटवडा भरून काढण्यासाठी आपले काही योगदान द्यावे म्हणून पालीतील बल्लाळेश्वर देवस्थानच्या वतीने व शासकीय रक्तपेढी अलिबाग यांच्या सहकार्याने बुधवारी (दि.३०) भक्त निवास क्रमांक १ मध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास तरुणांसह दिव्यांग व जेष्ठांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने नेत्रदीपक प्रगती केली असली तरी मानवी रक्ताला आजही पर्याय निर्माण झाला नाही, त्यामुळे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते.

या शिबिरात ३८ जणांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र व एक रोपटे भेट देण्यात आले. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ऍड. धंनजय धारप म्हणाले की मी देखील रक्तदान केले असून या रक्तदान शिबिरास सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. राहुल मराठे या तरुणाने सांगितले की रक्तदान करण्याची ही माझी ३१ वी वेळ आहे. तर ६० वर्षीय वासुदेव मराठे म्हणाले की गरजेच्या वेळेला जेष्ठांनी सुद्धा पुढे येणे गरजेचे आहे. तर दिव्यांग तरुण महेश शिदोरी यांनी सांगितले की मी नियमित रक्तदान करतो. संकटकाळात सर्वांनी समाजकार्यासाठी सरसावले पाहिजे. या रक्तदान शिबिरास देवस्थानचे अध्यक्ष ॲड. धंनजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्वस्त माधव साने, उपेंद्र कानडे, सचिन साठे व राहूल मराठे तसेच शासकीय रक्तपेढी अलिबागचे डॉ. दिपक गोसावी व त्यांची सर्व टिम, प्राचार्या डॉ. अंजली पुराणिक, शेखर सोमण, संजय लखीमळे आदी उपस्थित होते.



राव साहेब

अर्जदारांतर्फे वकील
श्री.अमोल पालकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.५८२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०७/२०२१

१) श्री.दत्तात्रय शांताराम आपटे
वय : ८२ वर्षे, धंदा : वयोवृद्ध
रा.फ्लॅट नं.१, रोड नं.१२, सेक्टर १२,
सिडको कॉलनी, नवीन पनवेल, जि.रायगड
२) श्री.महेश दत्तात्रय आपटे
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१, शिवधारा को-ऑप हौ.सो.,
फ्लॅट नं.४९, सेक्टर-९, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.सागर दत्तात्रय आपटे
वय : ४० वर्षे, धंदा : भिक्षुकी
रा.घर नं.१६, न्यू अंबिका सदन,
सी.एस.क्रॉस रोड नं.२, मातृछाया शाळेजवळ,
दहिसर (पूर्व), मुंबई-६८ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कुमूद दत्तात्रय आपटे या दि.०८/०१/२०२१ रोजी मरण पावले असून त्यांच्या मृत्यूपश्चात पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सिडको लिमिटेड यांचे दफ्तरी त्यांचे नावे आहे :-

**मौजे : नवीन पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सिडको लिमिटेड यांच्या हद्दीतील रोड नं.१२, सेक्टर १२ मधील प्लॉट नं.१ ज्याचे क्षेत्र १२५ चौ.मी. व त्यावरील ५३.८२ चौ.मी.क्षेत्राचे इमारत अशी मिळकत.**

आणि ज्याअर्थी सदर अर्जदार हे कै.कुमूद दत्तात्रय आपटे यांचे वारस असल्याने त्यांच्या मृत्यूपश्चात सदर मिळकत सिडको लिमिटेड यांच्या दफ्तरी सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता सदर अर्जदारांनी ते मयत कुमूद दत्तात्रय आपटे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३० माहे ०६ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# नारीशक्ती आक्रमक ; ठोस कारवाईची मागणी कर्जत चार फाटयावरील अतिक्रमण हटवा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहराचे मुख्य प्रवेशद्वार म्हणजे चारफाटा आहे. या चारफाट्यावर कृषी संशोधन, प्रादेशिक केंद्र असून, त्यांच्या व शासकीय जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम केले आहे. त्या बांधकामावर कारवाई होण्यासाठी नारीशक्ती संघटनेने मंत्रालय ते शासकीय कार्यालयात पत्रव्यवहार केले होते. त्यासंदर्भात कारवाई होण्यासाठी आदेश आले असतानाही कारवाई केली जात नसल्याने अखेर नारीशक्ती संघटनेने मंगळवारी २९ जून रोजी टिळक चौकात उपोषण सुरू केले आहे.

नारीशक्तीचे संघटनेचे ज्योती जाधव, स्वीटी बार्शी, सुप्रिया मोरे या उपोषणाला बसल्या असून अर्चना हगवणे, नीता केरकर, मानसी बार्शी त्यांना पाठिंबा देण्यासाठी उपस्थित होत्या. दिवसेंदिवस कर्जत चारफाट्यावर अतिक्रमण



वाढत आहे. त्यामुळे वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. कर्जतमध्ये प्रसिद्ध पर्यटन केंद्र माथेरान असल्याने तसेच डॅम, धबधबे, फार्महाउस, किल्ले, लेणी, जंगल परिसरामुळे गिर्यारोहण करण्यासाठी व पाहण्यासाठी, आनंद लुटण्यासाठी मुंबई-पुण्यावरून पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यात शनिवार व रविवारी या सुटीच्या दिवशी शिण घालविण्यासाठी खास मुक्कामासाठी येतात. त्यामुळे ये-जा करणारे प्रवासी या चारफाट्यावर असणाऱ्या हॉटेलमध्ये नाश्ता करण्यासाठी थांबतात. रस्त्याच्या कडेला हॉटेल, गाळे असल्याने गाडी पार्क करण्यासाठी जागा नाही. तर साहजिकच हॉटेलबाहेर गाड्या रस्त्यावर कसेही गाड्या पार्क करतात आणि इतर वाहनांना जाण्यासाठी रस्ता नसल्याने ट्रॅफिकची समस्या निर्माण होते. लोकप्रतिनिधी रोज याच रस्त्यावरून जात असतात त्यांना समस्या दिसूनही मोबाईलमध्ये लक्ष घालून कानाडोळा करीत आहेत. जर एखाद्या रुग्णाला अचानक अन्य रुग्णालयात हलव्याचे म्हटल्यास या चारफाटा रस्त्यावरून बाहेर निघताना वेळ जातो आणि वेळेवर उपचार न मिळाल्यास रुग्ण दगविण्याची शक्यता असते, तर याला जबाबदार कोण असणार? सदरील बांधकामांवर कारवाई होण्यासाठी आणि ते हटविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसीकडे पत्रव्यवहार केले होते. मात्र, आमच्या अखत्यारीत नसल्याचे सांगून जबाबदारी झटकवित आहे. त्यामुळे अखेर नारीशक्ती संघटनेने पुढाकर घेऊन जोपर्यंत अतिक्रमण हटविले जाणार नाही, तोपर्यंत उपोषणा माघार घेतले जाणार नाही, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

## दिव्यांगाच्या विविध समस्यांबाबत अपंग क्रांती संघटनेच्या शिष्टमंडळाने घेतली तहसीलदारांची भेट



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अपंग क्रांती संघटनेच्या शिष्टमंडळाने संघटनेचे अध्यक्ष बी.जी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुका तहसीलदार विजय तळेकर यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन दिव्यांगांच्या विविध समस्या व सबंधीत शासकीय योजना याबाबत सविस्तर चर्चा केली. शासनाच्या संजय गांधी निराधार योजने अंतर्गत जास्तीत जास्त दिव्यांगांना लाभ देण्यात येईल, अंत्योदय रेशन धान्य योजनेच्या माध्यमातून सर्व पात्र दिव्यांग कुटुंबांना लाभ मिळवून देण्यात येईल, तसेच ज्या दिव्यांग कुटुंबांत एक किंवा दोनच लाभार्थी असतील त्यांना शासकीय नियमानुसार अन्न सुरक्षायोजनेचा लाभ देण्याचे मान्य केले.

दिव्यांगांना उत्पन्नाचे दाखले देतांना सदर दाखले विनाविलंब व योग्य त्या प्रकारे देण्याचे मान्य करण्यात आले. तसेच एकाच कुटुंबांत एका पेक्षा जास्त दिव्यांग व्यक्ती असल्यास प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेच्या अंतर्गत पुर्ण लाभ मिळू शकतो. असे तहसीलदार तळेकर यानी स्पष्ट करून सांगितले. तसेच कार्यालयात दिव्यांगांच्या कामाला विशेष प्राधान्य देण्यात येईल असे आश्वासन ही देण्यात आले. यापुर्वी तहसील कार्यालयाच्या इमारतीत प्रवेश करताना उंच पाय-यांच्यामुळे दिव्यांग व्यक्ती, जेष्ठ नागरिक यांना चढ-उतार करणे कठीण जात होते. आता त्या पाय-या दिव्यांग व जेष्ठांनी चढण्यायोग्य सोयिस्कर बनविल्याबद्दल संघटनेतर्फे तहसीलदार याना धन्यवाद देण्यात आले. तसेच या मध्ये अजूनही सुधारणा करून कार्यालयाच्या आतिल बाजूने सोयिस्कर असा रॅम्प बनवून देण्याचे आश्वासन तहसीलदार यानी दिले. अशा प्रकारे संपूर्ण चर्चा अत्यंत सकारात्मक झाली. यावेळी कार्यालयातील इतर अधिकारी व संघटनेचे पदाधिकारी विलास फडके- रायगड जिल्हा अध्यक्ष, बाळाराम रोडपालकर- जिल्हा उपाध्यक्ष, अतुल रायबोले- पनवेल तालुका उपाध्यक्ष, नवीन पनवेल विभाग प्रमुख- उज्वला नलावडे, दत्तात्रेय पाटील- तळोजा विभाग, रामा धर्मा कलोते- प्रसिद्धी विभाग प्रमुख, रविंद्र राठोड- प्रसिद्धी विभाग प्रमुख यांनी सुध्दा या चर्चेत सहभाग घेतला होता.

## पनवेल तालुक्यातून मोटारसायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील सिद्धि करवले श्रीराम मंदिर येथे उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. प्रकाश पारधी (वय-१९) याने त्याची ४० हजारांची लाल रंगाची होंडा कंपनीची सीबी शाईन मोटारसायकल हि श्रीराम मंदिर येथे उभी करून तो कंटोली भाजी आणण्यास शेतात गेला असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटारसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्रं.६६३/२०२१
ने.ता.१९/०७/२०२१

सौ.सरला संतोष देशमुख
वय : ५१, व्यवसाय : गृहिणी
रा.मु.होनाड, पो.साजगाव, ता.खालापूर, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा कै.गजानन काशिनाथ देशमुख यांचा मृत्यू दि.०४/०९/१९७० रोजी राहत्या घरी गाव-कोपर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता. अर्जदार यांचे आजोबा कै.गजानन काशिनाथ देशमुख यांचे मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.गजानन काशिनाथ देशमुख यांचा वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२९/०६/२०२१ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

## माणगाव तालुक्यातील सर्प दंशाने तरुण शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

शेतात भात लावणीचे काम करताना कोणत्यातरी विषारी सापाने दंश केल्याने २२ वर्षाच्या संतोष मुकम या तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना माणगांव तालुक्यातील वारक आदिवासीवाडी येथे घडली.

या घटनेबाबत विजय गेणू धसाडे (रा. वारक आदिवासी वाडी) यांनी माणगांव पोलीस ठाण्यात खबर दिली आहे.

संदीप मुकम (रा. वारक आदिवासीवाडी) हा विजय धसाडे यांच्या शेतामध्ये भातलावणीचे काम करीत होता. यावेळी कोणत्यातरी विषारी सापाने त्याच्या डाव्या पायाच्या तळव्याला दंश केल्यामुळे त्याला तातडीने उपचाराकरिता माणगांव उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. येथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत झाल्याचे घोषित केले. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच संदीप मुकम याचा मृत्यू झाला होता.

माणगांव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून या घटनेची नोंद करण्यात आली असुन अधिक तपास पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस हवालदार दोडकुलकर हे करीत आहेत.

Hon'ble Bhakare Judge

Adv. K.P.SAYED
ADVOCATE

### PUBLIC NOTICE

**IN THE COURT OF HON'BLE JT.CIVIL JUDGE (S.D.) COURT AT PANVEL**

Civil Misc. Application No.468 of 2021
Exh. 8/D
N.D. 13/08/2021

1) Mr. Shahid Jamal Mallik
Age 41 years, Occupation-Private Service
2) Mrs. Khushnuda Jamaluddin Mallik
Age 58 years, Occupation-Homemaker
Both Indian Inhabitants, residing at
Flat No.607, 6 th floor, B Wing,
Milloni CHS Ltd., Plot No.109, Sector-27,
Nerul (East), Navi Mumbai-400706
3) Mrs. Kashmira Azad
Age 39 years, Occupation-Homemaker
Indin Inhabitant residing at
Flat No.803, 8 th floor, B Wing,
B-wing, Jawahar Nagar CHS Ltd.,
Harbor View, Plot No.49/2, Sector-19,
Nerul (East), Navi Mumbai 400706 Applicants

Whereas the above named Applicants have filed an application for Heir-ship certificate in respect of property mentioned in schedule hereunder written which stands joint names i.e.Mr.Shahid Jamal Mallik and deceased late Mr.Jamaluddin Abid Hussain Malik Flat No.502, on the 5 th Floor, in A-wing, in the Shelter Park Co-operative Housing Society Ltd., admeasuring about 759 Sq. ft. Built-up area and Terrace 56 Sq. ft., situated at Plot No.207, 208 & 209, Sector-10, Kharghar, Taluka : Panvel, District : Raigad. Deceased late Mr.Jamaluddin Abid Hussain Mallik died on 27/08/2013 at Hiranandani Hospital, Vashi, Navi Mumbai, leaving behind the aforesaid Applicants as legal heirs.

If anyone any right, share, claim in the above said Property should appear in person or through their advocates within 30 days from the date of publication of this notice, if no one appears and objects the application, this court will proceed to pass the necessary orders.

**Schedule of Property**

Name of deceased : late Mr.Jamaluddin Abid Hussian Malik

50% shares left by deceased in following property ;

Flat No.502, on the 5 th Floor, in A-wing, in the Shelter Park co-operative Housing Society Ltd., admeasuring about 759 Sq. ft. Built-up area and Terrace 56 Sq.ft., situated at Plot No.207, 208 & 209, Sector-10, Kharghar, Taluka : Panvel, District : Raigad .

GIVEN UNDER MY HAND AND SEAL OF THE COURT

On this 24 day of June 2021

Sd/- Jr.Clerk C.C.S.D.Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superitn. C.C.S.D.Panvel

राव साहेब

ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.७३७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०८/२०२१

१) श्रीमती.कलावती बलवान कनोजीया
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.नेहा अजय कनोजीया
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बुथुआ बुजुर्ग, अराव जगदीश,
उरुवा बाजार, गोरखपूर, उत्तर प्रदेश, २७३४०७
३) सौ.सिमा जितेंद्र कनोजीया
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हाऊस नं.३०/३ रावजी पटेल चाळ,
पो.ऑफिस रोड अमरेवाडी, मु.पो.अमरेवाडी,
अहमदाबाद सिटी, गुजरात ३८००२६
४) सौ.रेणु अजय कुमार चौधरी
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पिपरा, हेमा पिपरा, सहजनवा,
गोरखपूर, उत्तरप्रदेश २७३२०९
५) कु.प्रियंका बलवान कनोजीया
वय : २३ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्रं.१ व ५ रा.एल.आय.जी.,
रुम नं.१० एम-३६, सेक्टर ३ ई,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ ते ५ यांचे वडील म्हणजेच मयत कै.बलवान रामदास कनोजीया हे दि.१७/०५/२०२१ रोजी अष्टविनायक हॉस्पिटल खांदा कॉलनी येथे मयत झाले आहेत तसेच त्यांची मौजे : नवीन पनवेल/खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील सदनिका आहे.

**मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**सपना सोसायटी रजि.नं.**NBOM/CIDCO/HMG(OH)/316/JTR/1995-96

| मौजे | युनिट नं. | प्लॉट नं. | सोसायटीचे नाव |
|---|---|---|---|
| नवीन पनवेल | १० | सी-२० | सपना सोसायटी |

कै.बलवान रामदास कनोजिया यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.५ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.बलवान रामदास कनोजया यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.बलवान रामदास कनोजीया यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ३०/०६/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे साो.कोर्ट

ॲड.तृप्ती ग. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.६१४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०८/२०२१

१) श्री.दिपेश सुर्यकांत म्हसकर, वय : २९ वर्षे
रा.१३००/बी, म्हसकर निवास,
गावदेवी पाडा, गावदेवी मंदिर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
सौ.श्रद्धा निरज म्हात्रे, वय : २७ वर्षे
रा.खोपटा, ता.उरण, जि.रायगड
१. श्री.स्वप्नील सुर्यकांत म्हसकर, वय : ३१ वर्षे
रा.चाळीस गाव दर्जा, ता.चाळीसगाव, जि.जळगाव सामनेवाले

अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ च्या (VIII) प्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता रक्कम रु.४,९५,०००/-

१) अर्जदार यांनी सदरचा चौकशी अर्ज वारसदाखला मिळणेकरिता मे.कोर्टात दाखल केला आहे. सदरहू अर्जदार यांचे वडील सुर्यकांत शांताराम म्हसकर हे दि.१/०८/२०२० रोजी मयत झालेले आहेत. सामनेवाली क्र.१ ही मयत व्यक्तीची मुलगी असून सामनेवाला क्र.२ हा मयताचा मुलगा आहे. सदर मयताचा मृत्यूचा दाखला सदर अर्जा सोबत दाखल करीत आहे. अर्जदार व सामनेवाले हे मयत व्यक्तींचे कायदेशीर वारस आहेत.

२) अर्जदार यांची आजी म्हणजेच मयत सुर्यकांत शांताराम म्हसकर यांची आई कै.सिताबाई शांताराम म्हसकर या दि.१९/११/२०१२ रोजी मयत झालेल्या आहेत. कै.सिताबाई शांताराम म्हसकर यांच्या मृत्यूनंतर कै. सुर्यकांत शांताराम म्हसकर यांचे नावे अर्जातील उल्लेखित मिळकत कायदेशीर हक्काने आलेली आहे. अर्जदार यांचे वडील कै.सुर्यकांत शांताराम म्हसकर यांचे पश्चात तांत्रिक बाबींची अडचण उपस्थित होवू नये म्हणून मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांचे नाव मिळकतीवर नोंद होण्याकरिता अर्जदार सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३) सदरहू अर्जदार यांचे वडील कै.सुर्यकांत शांताराम म्हसकर ह्यांचे नावे दि.२७/१२/२०१६ रोजीच्या विकसन करारनाम्यामध्ये अर्जात उल्लेखीत मिळकत ही मयताचे नावे हस्तांतरीत करण्यात आलेली होती. मयत व्यक्तींचे अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत.

४) मयत वडील कै.सुर्यकांत शांताराम म्हसकर यांनी त्यांचे मृत्यूचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व सामनेवाले यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही इतर वारस नाहीत. मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असणाऱ्या खालील वर्णनाच्याा काही मिळकती आहेत. त्याचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**म्हसकर निवास, गावदेवी पाडा,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

| सि.टी.एस नंबर | भूखंडाचे क्षेत्र |
|---|---|
| १३००/बी | ९७ चौ.मीटर |
| म्हसकर निवास तिसरा मजला | सदनिका क्र.३ |

सदर मिळकतीस चतुःसिमा पुढीलप्रमाणे :-
पुर्व : श्री.शेंडे ह्यांची मिळकत
पश्चिम : श्री.घरत ह्यांची मिळकत
दक्षिणेस : रस्ता
उत्तरेस : श्रीमती मुक्ता भोईर हिची मिळकत

येणेप्रमाणे जमीन मिळकती असून वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## वृद्ध महिलेचे दागिने लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन खेचून दोन अज्ञात इसम पसार झाल्याची घटना खारघर वसाहतीत घडली आहे. शैलजा शिंदे (वय-७१, रा.-से.-१५ खारघर) या सकाळी मॉर्निंग वॉकसाठी जात असताना स्पॅगेटी बस स्टॉप शेजारी सर्व्हिस रोडवर उभ्या असलेल्या एका तरूणाने व्यायाम करण्याचा बहाणा करून तो त्यांच्या मागे आला व त्याने संधी साधून त्यांच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची १०२ मण्यांची सोन्याची चेन खेचून तो त्याच्या साथीदाराच्या मोटारसायकलीवरून पसार झाला. याबाबतची तक्रार खारघर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटारसायकलच्या डिक्कीमधून अज्ञात चोरट्यांनी मोबाईल चोरल्याची घटना शहरातील गुजराती शाळेजवळ, पटवर्धन हॉस्पिटलसमोर घडली आहे.

मिलिंद जैतपाल (वय-२८, रा.-नवीन पनवेल) यांनी त्यांची मोटारसायक उभी करून ठेवली असता, मोटारसायकलच्या डिक्कीत असलेला १० हजारांचा मोबाईल लबाडीच्या इराद्याने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिक चंद्रकांत आरकशी सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिक चंद्रकांत महादेव आरकशी हे आपली ३७ वर्षे ७ महिने उत्तम प्रकारे सेवा करुन आज दि.३० जून २०२१ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांना उपस्थित मान्यवरांतर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागात अलिबाग येथे दि.१ डिसेंबर १९८३ रोजी चंद्रकांत आरकशी हे सेवेत रुजू झाले. त्यानंतर दि.११ जानेवारी १९९४ रोजी जव्हार-ठाणे येथील कार्यालयात कनिष्ठ लिपिक पदावर रुजू झाले. पाचवर्षानंतर दि.१७ आक्टोबर १९९८ ला मार्ग प्रकल्प विभाग-महाड येथे बदली झाली. तीन वर्षांनंतर दि.२७ जून २००१ मध्ये मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम उपविभागात कनिष्ठ लिपिक पदावर १५ वर्षे उत्तम प्रकारे सेवा केली. दि.१९ मे २०१६ रोजी त्यांना वरीष्ठ लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आली. चंद्रकांत आरकशी हे ३७ वर्षे ७ महिने उत्तम प्रकारे सेवा करुन आज सेवानिवृत्त झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात कनिष्ठ अभियंता अक्षय माने, अमित लोंढे व पल्लवी एकंडे व कर्मचारी वृंद यांच्या हस्ते चंद्रकांत आरकशी यांना श्री.साईबाबा यांची प्रतिमा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी उपस्थितांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# माथेरान नगरपरिषदेत स्वबळावर सत्ता स्थापन अशक्यच !

**दै.रायगड नगरी । माथेरान**

**माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीला अवघे पाच महिने उरलेले असताना आतापासूनच प्रत्येक पक्षात निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. मुख्य पक्ष समजल्या जाणाऱ्या शिवसेना, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष यांनी सत्ता स्थापन करण्यासाठी पक्षबांधणी करण्यास सुरुवात केली असून अन्य पक्षातील कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात खेचण्यासाठी पक्षप्रवेशासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे.त्यामुळे पावसाळ्यात या थंडीच्या दिवसांत मात्र इथल्या राजकीय वातावरणात गरमी दिसून येत आहे. नुकताच शिवसेनेच्या नऊ आणि एक स्वीकृत सदस्यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपात प्रवेश केल्यामुळे काहीअंशी का होईना शिवसेनेला याचा फटका बसला आहे. परंतु आपण केलेल्या विकास कामांच्या जोरावर येत्या काळात पुन्हा एकदा शिवसेनेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी शिवसेनेची दिग्गज मंडळी छातीठोकपणे दावा करीत आहेत. जवळपास दीडशे मताधिक्य असणाऱ्या भाजप पक्षाला शिवसेनेतील एकूण दहा नगरसेवकांच्या प्रवेशामुळे एकप्रकारे ऑक्सिजन प्राप्त झाला आहे. त्यामुळे भाजप सुध्दा आगामी निवडणुकीतील सत्तेचे दावेदार असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.**

मनसे आणि शेकाप यावेळी भाजप सोबत जाण्याची शक्यता असली तरी सुद्धा काँग्रेस आणि भाजप यांनी अप्रत्यक्षपणे एकत्रित स्वतःच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवली तर मनसे आणि शेकापच्या मतांचा फायदा काँग्रेस आणि भाजपला होऊ शकतो. २०१६ च्या निवडणुकीत पराभव पत्कल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य नेते आणि कार्यकर्त्यांनी सुध्दा एकप्रकारे नांगी टाकल्या प्रमाणे वावरत होते.परंतु ते सुध्दा येत्या निवडणुकीत आपली ताकद पणाला लावणार असेही चित्र हळूहळू निर्माण झाल्याचे वातावरण अंधुक प्रमाणात का होईना दिसत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी मागील दोन वर्षांपासून गावातील समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून आपली एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. तर अल्प मतदार संख्या असलेले शेतकरी कामगार पक्ष आणि आरपीआय हे नेहमीप्रमाणे कुणाला तरी आधार देऊन मिळेल त्यात समाधान ह्याच भूमिकेवर ठाम असल्याचे चित्र दिसत आहे.

यातील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी मागील वर्षीच २०२१ ची नगरपरिषदेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा नारा दिला आहे.यापूर्वी दोन्हीही काँग्रेस पक्षांनी आघाडी करून आपापल्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवली होती.तर शिवसेनेने स्वबळावर अर्थातच यामध्ये शेतकरी कामगार पक्ष, आरपीआय, मनसे आणि काही भाजपच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिल्यामुळे शिवसेनेने धनुष्यबाण या आपल्या चिन्हावर या मंडळींना सोबत घेऊन निवडणूक लढवली होती. त्यामुळे शिवसेनेला एकहाती सत्ता स्थापन करता आली होती. त्याचवेळी भाजपने सुध्दा स्वबळावर निवडणूक लढवली होती परंतु त्यांना त्यावेळी पूर्णतः अपयश आले होते. एकाही उमेदवाराला नगरपरिषदेच्या सभागृहात जाता आले नव्हते.

माथेरानच्या राजकीय इतिहासात आजवरच्या काळात कुठल्याही एकाच प्युअर पक्षाला स्वबळावर एकहाती सत्ता स्थापन करता आलेली नाही. कुठल्या तरी पक्षाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पाठिंबा घेऊनच सभागृहात विराजमान होता आले आहे. त्यामुळे जरी कुणी कितीही स्वबळाची आगपाखड केली तरीसुद्धा त्यांना कुणाचा तरी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे



आधार घेऊनच निवडणूक लढवावी लागणार आहे यात शंका नाही. पाच वर्षांनी निवडणुका येतात त्यामुळे उगाचच हेका करण्यापेक्षा सत्तेत विराजमान झालेले अधिक उत्तम हीच भावना अंगीकारल्याशिवाय कोणत्याही पक्षाला गत्यंतर नाही. स्वबळाचा आव आणून कुणालाही पाच वर्षे मागे जायचे नाही त्यामुळे युत्या आघाड्या हाच एकमेव पर्याय ठरणार आहे. अंदाजे डिसेंबर महिन्यात या सार्वत्रिक निवडणुका पार पडणार असून अद्याप आरक्षण जाहीर करण्यात आलेले नाही.ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात आरक्षण जाहीर करण्यात येण्याची शक्यता आहे त्यामुळेच सर्व राजकीय मंडळी गप्प बसले आहेत. तर खिशातील दमडी न खर्च करता फुकटात पक्षाच्या खर्चावर निवडणूक लढविण्यासाठी अगोदरच बहुतेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून बसलेले आहेत.

सत्तेच्या या सारीपाटात सरशी होण्यासाठी यावेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला एकतर भाजपला सोबत घ्यावे लागेल आणि त्यातून काही शिव-सेनेतील अंतर्गत फुटीर असू शकतात की जे शिवसेना या स्वतःच्या पक्षासोबत राहुन सुध्दा पक्षाशी ऐनवेळी गद्दारी करू शकतात असे मोहरे हेरून त्यांना त्यांच्या पुढील मागण्या मान्य करून सोबत ठेवावे लागण्याची शक्यता असून पुढील निवडणूक लढवुन सत्ता स्थापन करता येऊ शकते. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी गेल्या वर्षी काही शुल्लक कारणास्तव फारकत घेतल्यामुळे काँग्रेस पक्षाने स्वबळाचा नारा दिला आहे त्यांना झुकविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जरी वरीष्ठ पातळीवरून शिवसेनेशी युती करण्याचे संकेत नसले तरीसुद्धा स्थानिक पातळीवर अप्रत्यक्षपणे स्वतःच्या चिन्हावर निवडणूक लढवून आतल्या गोटातून कदाचित शिवसेनेशीच आघाडी करावी लागणार आहे तेव्हाच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सत्तेवर ताबा मिळविता येऊ शकतो. मतदारांसमोर आगामी निवडणूक ही जरी अप्रत्यक्षपणे तिरंगी भासत असली तरी होणारी निवडणूक ही निश्चितच दुहेरी असणार असेही जाणकार मंडळींमधून बोलले जात आहे.

## सरपंच सेवा महासंघाच्या तळा तालुकाध्यक्षपदी ज्योती पायगुडे

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील गिरणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. ज्योती कैलास पायगुडे यांची सरपंच सेवा महासंघाच्या तळा तालुकाध्यक्षा पदी निवड करण्यात आली आहे. ज्योती पायगुडे या तालुक्यातील भाजपच्या पहिल्या महिला सरपंच असून त्यांनी आपल्या गिरणे ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना अनेक योजनांचा लाभ मिळवुन दिला आहे. यांसह सध्याच्या कोरोना काळात त्यांनीमहत्वाची भूमिका बजावली असून गावात नियमित जंतुनाशक फवारणी करून घेणे, नागरिकांची आरोग्य तपासणी, लसीकरण तसेच ग्रामपंचायतीमार्फत गावात अनेक विकासकामे देखील केली आहेत. कोरोना लसीकरण उपक्रम राबविले त्यामुळे ग्रामपंचायत हद्दीतील जनतेला एकाचवेळी लस घेऊन लसी संदर्भात असलेल्या गैरसमज दूर केला. स्वच्छपाणी पुरवठा योजना एक ना अनेक शासनाच्या योजनेचा लाभ तळागाळातील जनतेला करून दिला. त्यामुळे ग्रामीण



ग्रामीण भागातील विकासाचे क्रांतिकारक सर्व गुण पाहता सरपंच सेवा महासंघाचे संस्थापक, राज्यअध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे यांनी त्यांची तालुकाध्यक्षा पदावर नुकतीच नियुक्ती केली आहे. सरपंच सेवा महासंघ ही संघटना सरपंचाच्या न्याय व हक्कासाठी लढणारी महाराष्ट्रातील एकमेव नोंदणीकृत संघटना आहे. या संघटनेच्या राज्य कार्यकारिणीने विविध मागण्या मंजूर करून घेतल्या आहेत. ज्योती पायगुडे यांच्या सारख्या उच्चशिक्षित सरपंच महिलेची तळा तालुकाध्यक्षापदी निवड झाल्याने तालुक्यातील सरपंचांचे प्रश्न, समस्या मांडण्यासाठी उत्कृष्ट नेतृत्व मिळाल्याचे मत तालुक्यातील सरपंचांमधून व्यक्त करण्यात येत आहे. भविष्यात सरपंचांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असून तालुक्या ठिकाणी हक्काचे व्यासपीठ म्हणून सरपंच भवन उभारणी साठी प्रयत्न केला जाईल. असे प्रतिनिधीशी प्रतिक्रिया व्यक्त करुन तालुक्यातील सरपंचानी सघंटीत रहावे असे आवाहन केले. ज्योती पायगुडे यांच्या निवडीने सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## प्रिमियम शुल्काच्या रूपात पालिकेला मिळणार करोडो रुपयांचे उत्पन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बांधकाम परवानगीच्या माध्यमातुन पनवेल महानगरपालिकेला प्रीमियम शुल्काच्या माध्यमातुन कोरोडोंचे उत्पन्न मिळणार आहे. महानगरपालिकेच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे पालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे. यापूर्वी पनवेल महापालिकेला प्रिमियम शुल्क मिळत नव्हता. नगरविकास विभागाकडे आयुक्तांनी केलेल्या पत्र व्यवहारामुळे महापालिकेला प्रीमियम शुल्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य सरकारच्या नव्या युडीसीपीआर या नव्या धोरणातील त्रुटी दूर करण्यासाठी आयुक्तांनी नगरविकास विभागाकडे पत्रव्यवहार केला होता.बांधकामांना वाढीव एफएसआय देण्यासाठी रेडीरेकनरच्या दराने प्रिमियम शुल्क आकारून वाढीव एफएसआय दिला जातो. या वाढीव प्रिमियम शुल्काची ५० टक्के रक्कम नियोजन प्राधिकरण म्हणून महापालिकांना आणि उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाला देण्यात येते. पनवेल महपालिकेची स्थापना होवून ५ वर्षे पुर्ण होत आली तरी अद्याप महापालिकेला देण्यात आलेली नाही.

महापालिका हद्दीतील मात्र जमीनमालक सिडको म्हणून कोट्यावधींची प्रिमियम शुल्क सिडको महामंडळाकडे वर्ग होते होते. राज्य सरकारने एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली जाहिर केल्यानंतर तत्कालीन आयुक्त सुधाकर देशमुख यांनी नगरविकास विभागाला पत्र पाठवून याबाबत मार्गदर्शन करण्याची मागणी केली होती. जमीनमालक सिडको असली तरी आता नियोजन प्राधिकरण म्हणून सेवा सुविधा पुरविण्याची जबाबदारी पनवेल महापालिकेची आहे. त्यामुळे प्रिमियम शुल्क आणि अँन्सिलरी शुल्क पनवेल महापालिकेमध्ये जमा होणे आवश्यक आहे असे मत देशमुख यांनी नोंदविले होते.

नगरविकास विभागाने आयुक्तांनी उपस्थित केलेला मुद्दा ग्राह्य धरून पनवेल महापालिका हद्दीतील बांधकामांना परवानगी देताना वाढीव एफएसआयच्या मोबदल्यात येणारे प्रिमियम शुल्क आणि अँन्सिलरी रक्कम ५० टक्के पनवेल महापालिकेकडे जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित २५ टक्के रक्कम जमीन मालक म्हणून सिडको आणि २५ टक्के रक्कम शासनाला भरण्याच्या सूचना देण्यात आल्या. महापालिका क्षेत्रातील खारघर नोड नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोकडे असले तरी या भागातील प्रिमियम शुल्काच्या रक्कमेतील २५ टक्के रक्कम पनवेल महापालिकेला देण्याच्या सूचना केल्या आहे. या निर्णयामुळे केवळ पनवेल शहरापुरते मर्यादित प्रिमियम शुल्क मिळणाऱ्या महापालिकेला आता कोट्यावधींचा फायदा होणार आहे. खारघर, तळोजा आदी भागात सुरू असणाऱ्या विकासकामांचा फायदा महापालिकेला होणार आहे.

## बँक एटीएममधून लबाडीने केली रोख रक्कम लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एटीएममध्ये पैसे काढत असताना सदर व्यक्तीचे लक्ष विचलीत करून हातचलाखीने त्याच्याकडील एसबीआय बँकेचे एटीएम कार्ड बदलून ते स्वतःकडे घेऊन स्वतःच्या फायद्याकरीता स्वतःकडे ठेवून त्याचा वापर वेगवेगळ्या ठिकाणी करून सदर इसमाच्या खात्यातील जवळपास ३६ हजार लबाडीने काढल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

प्रविण चोरघे (वय-३८) हे एसबीआय बँक पनवेल येथे पैसे काढत असताना त्यांचे लक्ष विचलीत करून दोन अनोळखी इसमांनी हातचलाखीने त्याच्याकडील एसबीआय बँकेचे एटीएम कार्ड बदलून ते स्वतःकडे घेऊन स्वतःच्या फायद्याकरीता स्वतःकडे ठेवून त्याचा वापर वेगवेगळ्या ठिकाणी करून सदर इसमाच्या खात्यातील जवळपास ३६ हजार लबाडीने काढल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


श्री.भाकरे साो.कोर्ट

अॅड.राजेश तु.बांगर
अर्जदार तर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.६३९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/०८/२०२१

१) स्मिता शांताराम शिंदे
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.शांताराम रामचंद्र शिंदे
वय : ७१ वर्षे, धंदा : सेवानिवृत्ती
दोघेही रा.फ्लॅट नं.२५, महिंद्रा शोरुम जवळ,
कामोठे, सेक्टर ६ ए, कळंबोली नोड,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांची आई व अर्जदार क्रं.२ यांची पत्नी कै.सरोज शांताराम शिंदे यांच्या नावे असलेल्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन :- फ्लॅट क्रं.१०१, पहिला मजला, बी-विंग, साईनाथ को.हौ.सो., प्लॉट नं.२५, सेक्टर ६ ए, कामोठे, जीइएस, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.सरोज शांताराम शिंदे ह्या दिनांक ०९/०२/२०१६ रोजी बी-२०१, साईनाथ अपार्टमेंट, से.६ अ, कामोठे येथे निधन झाल्या असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी/आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारसदाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज तारीख ३०/०६/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



श्री.भाकरे साो.कोर्ट

अॅड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.६६९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२०२१

१) श्री.मोहम्मद युसूफ नबी रसूल इंडी
वय : ६० वर्षे, धंदा : व्यापार
२) श्री.मोहम्मद फारुक नबी रसूल इंडी
वय : ५६ वर्षे, धंदा : डॉक्टर
३) श्रीमती.आयेशा खुर्शीद अली खैरदी
वय : ४९ वर्षे, धंदा : व्यापार
सर्व रा.पटेल मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील म्हणजेच मयत पै.नबी रसूल मक्तुम साहेब इंडी यांच्या मालकीची मौजे : खान प्लाझाा पटेल मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील ब्लॉक/निवासी सदनिका आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सदनिका क्रं. | क्षेत्र | इमारतीचे नाव | मौजे |
|---|---|---|---|
| तळमजला | ४५५ चौ.फूट बिल्टअप | ''खान प्लाझा'' ब्लॉक नं.०१, ''ए'' विंग, पटेल मोहल्ला | पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड |

अर्जदारांचे वडील पै.नबीरसूल मक्तुम साहेब इंडी यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्ज वर पॅरा नं.५ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.नबी रसूल मक्तुम साहेब इंडी व मयत पै.हाफीजाबीबी नबी रसूल इंडी यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या पै.नबीरसूल मक्तुम साहेब इंडी व मयत पै.हाफीजाबीबी नबी रसूल इंडी यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.३०/०६/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



## ग्रामपंचायत विचुंबे

**ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर निविदा

विचुंबे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व अनुभवी ठेकेदार यांस,

आपणास कळविण्यात येते की, जिल्हा वार्षिक योजना सन २०२०/२१ अंतर्गत खालीलप्रमाणे सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि.०८/०७/२०२१ रोजी निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे, कोणतेही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणारे सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत रक्कम ५% | ठेकेदाराचा वर्ग | निविदा किंमत | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीत अभ्यासिका तयार करणे | ५९३४९३/- | ५९३४/- | २९६७४/- | क | १०० | ०८/०७/२०२१ | ३ महिने |
| २ | ग्रामपंचायत कार्यालयासमोर नदीच्या बाजूला उद्यान तयार करणे. | ७०२६४३/- | ७०२६/- | ३५१३२/- | क | १०० | ०८/०७/२०२१ | ३ महिने |
| ३ | ग्रीन व्हॅली सोसायटी ते निर्वाणा सोसायटी पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे | ४९९९७६/- | ४९९९/- | २४९९८/- | क | १०० | ०८/०७/२०२१ | ३ महिने |

अटी व शर्ती :

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) ग्रामपंचायतीकडे विनंती केल्यास रु.१००/- भरणा केल्यास अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येईल.
३) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
४) निविदा किंमत ना-परतावा समजावी.
५) मुल्यांकनप्रमाणे अदा करावयाच्या रकमेतून नियमाप्रमाणे १२% जी.एस.टी., १% सेस, १% आयकर, १% मजुरविमा, १% इसारा, ५% दराने सुरक्षा अनामत रक्कम पात करण्यात येईल.
६) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
७) निविदा मंजूर केल्यास रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून द्यावा लागेल.
८) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल व सदरची सुरक्षा अनामत कामाची गुणवत्ता पाहून ६ महिन्यानंतर अदा करण्यात येईल.
९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकनाप्रमाणे व रकमेच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) निविदा मंजूर केल्यास दोन दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक राहील.
१२) ग्रामपंचायतीकडे उपलब्ध होणाऱ्या अनुदानानुसार सदर बिलाची रक्कम अदा करण्यात येईल.

दिनांक : ०१/०७/२०२१

**सही/-
श्री.जे.पी.चवरकर
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत विचुंबे
ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-
सौ.नम्रता आकाश पाटील
सरपंच
ग्रामपंचायत विचुंबे
ता.पनवेल, जि.रायगड**